# पारधी समाजाच्या संघर्षाची वास्तवदर्शी कहाणी ‘निर्जळी’

पुणे, दि. १९ फेब्रुवारी २०२५ : पारधी समाजाच्या संघर्षाची वास्तवदर्शी कहाणी म्हणजे, ‘निर्जळी’ हा चित्रपट असल्याचे चित्रपटाच्या दिग्दर्शिका स्वाती कडू यांनी सांगितले. २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ‘निर्जळी’ हा चित्रपट दाखवण्यात आला त्यानंतर कडू बोलत होत्या.

स्वाती कडू यांनी दिग्दर्शनासोबत या चित्रपटात प्रमुख भूमिकाही साकारली आहे. स्वाती कडू म्हणाल्या, “ब्रिटिश काळात ‘जन्मजात गुन्हेगार’ ठरवलेल्या पारधी समाजावर ७५ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही अन्याय सुरूच आहे. जमीन, घरे, शिक्षण आणि स्थिर व्यवसायापासून वंचित असलेल्या या समाजाच्या व्यथा ‘निर्जळी’ मांडतो. शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या किशोरीची कथा म्हणजे हा चित्रपट आहे. स्वाती कडू म्हणाल्या, की कल्पनेतून नव्हे, तर वास्तवातून निर्माण झालेली ही कथा आहे.

**‘मॅजिक’**

एन्काउंटर झाल्यानंतरची मानसिक स्थिती नेमकी काय असते, यावर अनेक दिवस विचार सुरू होता, तो आता चित्रपटाच्या रूपाने प्रत्यक्षात उतरत असल्याचे ‘मॅजिक’ चित्रपटाचे दिग्दर्शक दिग्दर्शक रविंद्र करमरकर यांनी सांगितले.

२३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ‘मॅजिक’ हा चित्रपट दाखवण्यात आला त्यानंतर करमर आणि लेखक अभिषेक देशमुख यांनी संवाद साधला. जितेंद्र जोशी यांचा अभिनय, अभिषेक देशमुख व योगेश जोशी यांचे लेखन आणि रविंद्र करमरकर यांचे दिग्दर्शन यांतून तयार झालेला ‘मॅजिक‘ने ‘पिफ’मध्ये प्रेक्षकांना खिळवून ठेवले. करमरकर म्हणाले, की त्यांना चित्रपटाची प्रेरणा त्यांच्या वडिलांच्या अनुभवांतून मिळाली.